ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 2 | OCT - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# यशवंत चंद्रोजी उर्फ वाय. सी. पाटील यांचेडाव्या चळवळीतील कार्य



**डॉ. विवेकानंद राजाराम माने**
इतिहास विभागप्रमुख,
क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल जि. सांगली.

## प्रस्तावना:

श्री. यशवंत चंद्रोजी उर्फ वाय. सी. पाटील यांनी सांगली जिल्ह्याच्या विकासात डाव्या विचारसरणीला अनुसरून महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी शेतकरी, कामगार, धरणग्रस्त, महिला इ. सर्वसामान्य वर्गाच्या विकासासाठी मोठे कार्य केले आहे. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात क्रांतिकारकांसाठी लागणारा पैसा उभारण्यासाठी विविध योजना आखण्यात त्यांचा सहभाग होता. त्याचा राजकीय क्षेत्राकडे ओढा व समाजसेवेचे बिजारोपण हे १९३७ सालापासूनच झाले. शे.का.पक्षाच्या स्थापनेत त्यांचा सहभाग होता व या पक्षाच्या वतीनेच १९५७ साली मुंबई विधानसभेवर त्यांची निवड झाली.

## १. विद्यार्थी जीवनातील वाय. सी. पाटील यांचे कार्य :

वाय. सी. पाटील हे शिराळा तालुक्यातील चळवळीत अग्रभागी राहणारे नेतृत्व होते. भारत छोडो आंदोलनाच्या वेळी ते बी. ए. च्या पहिल्या वर्गात शिकत होते. चले जाव चळवळ सुरू होताच त्यांनी या चळवळीत स्वत:ला झोकून दिले. या काळात त्यांनी सातारा जिल्हा विद्यार्थी संघटना स्थापन करून विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य लढ्यात भाग घेण्यास प्रवृत्त केले. स्वातंत्र्य चळवळीचा सेवादल व विविध शिबिरातून प्रचार केला. शिक्षण चालू असतानाच त्यांनी सरकारने फी वाढविल्याबद्दल विद्यार्थ्यांना संघटीत करून जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चा काढला व त्या मोर्चाचे नेतृत्व त्यांनी स्वत: केले.[१] इंग्रज सरकार कशा प्रकारे आपल्यावर अन्याय करून आपले शोषण करत आहे हे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले आणि विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजांविरूध्द उठाव करण्यासाठी प्रेरणा निर्माण केली.

इ.स. १९४० मध्ये शिराळा—वाळवा तालुक्याची विद्यार्थी कॉंग्रेसची संघटना वाय. सी. पाटील व नागनाथ अण्णा यांनी मिळून स्थापन केली. इ.स. १९४० मध्ये या संघटनेमार्फत विद्यार्थ्यांचे अधिवेशन कामेरी या गावी कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब खर्डेकर यांच्या अध्यक्षतेखाली घेतले. या अधिवेशनामध्ये इस्लामपूर येथे मोफत बोर्डिंग चालविण्याचे व राष्ट्रीय हायस्कूल काढण्याचे ठरविण्यात आले. तसेच वाय. सी. पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी कॉलेजचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय हायस्कूल सुरू करण्याचा ठराव केला. याच वर्षी उरण येथे बोर्डिंग सुरू करण्यात आले. वाय. सी. पाटील यांनी ब्रिटीशांच्या विरूध्द कोल्हापूर प्रजा परिषदेमार्फत काढली जाणारी पत्रके कोल्हापूरातील वेगवेगळ्या बोर्डींगमधील विद्यार्थ्यांना तसेच हायस्कूल व कॉलेजमधील विद्यार्थ्यांना वाटण्याचे काम केले. ब्रिटिशांच्या विरूध्द सशस्त्र उठाव करण्यासाठी सुभाषबाबू प्रयत्न करीत असताना सरकारने त्यांना पकडून कैदेत ठेवले. त्याच्या निषेधार्थ सर्व देशभरातील विद्यार्थ्यांनी व तरूणांनी हरताळ व निदर्शने केली. यावेळी

कोल्हापूरातील हायस्कुलमधील सर्व विद्यार्थ्यांना हरताळ पाळून निषेधात्मक तीव्र आंदोलन घडवून आणण्याचे कार्य वाय. सी. पाटील यांनी केले.[२]

## २. शैक्षणिक कार्य:

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या भाषणांचा वाय. सी. पाटील यांच्या मनावर परिणाम होवून त्यांच्यात सामाजिक सुधारणा व विषमता यांच्या विरूध्द बंड करण्याची प्रेरणा निर्माण झाली. समाजातील धर्ममार्तंडांनी निर्माण केलेली वर्णव्यवस्था व त्यामुळे विषमतेवर आधारलेली जातिव्यवस्था नाहीशी करण्यासाठी शिक्षणाद्वारेच प्रयत्न केले पाहिजते. यासाठी राष्ट्रीय शाळा सुरू करून लोकांना सुशिक्षित व सुसंस्कृत बनविण्याच्या उद्देशाने त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने विविध संघटना व संस्थांची स्थापना केली. राष्ट्रीय चळवळ गतीमान करण्यासाठी आचार्य जावडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ब्राम्हणी जातीवादाला म्हणजे आर. एस. एस. या संघटनेला शह देण्यासाठी स्नेहसंवर्धक मंडळ स्थापन केले. श्रीराम सेवा मंडळाची स्थापना करुन त्यामार्फत इस्लामपूर येथे खादी भांडार सुरू केले. तसेच शिराळा तालुक्याच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागातील सर्वदृष्टीने वंचित असलेल्या जनतेसाठी चिंचेवाडी वगैरे ठिकाणी सहा—सात गावांत खाजगी मराठी शाळा सुरू केल्या. १९४१ साली इस्लामपूर व वाळवा येथे बोर्डिंग सुरू केली.[३]

दरम्यानच्या काळात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाउराव पाटील यांनी माध्यमिक शाळेतून शिकून तयार झालेल्या विद्यार्थ्यांना जिल्ह्यातच कॉलेजच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी छत्रपती शिवाजी कॉलेज काढण्यासाठी सातारला सुरू करण्याची घोषणा केली. मात्र कॉलेज काढण्यासाठी पुणे विद्यापीठाकडे ५०,००० रू. डिपॉझिट ठेवावे लागणार होते. तेव्हा या आर्थिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी वाय. सी. पाटील, नागनाथअण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांनी विचार करून सामाजिक जाणीव ठेवून अण्णांना कॉलेजच्या डिपॉझिटसाठी पैसे देण्याकरीता व त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना एक लाख रूपये वैयक्तिक निधी देण्याचा संकल्प केला. सन १९४६ साली यासाठी सातारा जिल्हा विद्यार्थी कॉंग्रेसची स्थापना केली व त्याचे पहिले अधिवेशन कराड तालुक्यातील कापिल येथे साने गुरूजींच्या अध्यक्षतेखाली सन १९४६ साली घेतले. याच अधिवेशनामध्ये कर्मवीर अण्णांना एक लाख रूपयांची थैली देण्याचा ठराव मंजूर करून घेतला. या निधीचे वाय. सी. पाटील हे खजिनदार होते. अण्णांना १ लाख १० हजार रूपये एवढा निधी संत शिरोमणी गाडगे महाराजांच्या हस्ते सातारा येथे धननीच्या बागेमध्ये अर्पण करण्यात आला.[४]

## ३. प्रतिसरकारमधील कार्य :

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या प्रतिसरकारमधील वाय. सी. पाटील हे एक लढवय्ये होते. गटप्रमुख म्हणून नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली चाललेले प्रतिसरकार त्यांनी राबविले तसेच त्यांनी भूमिगत असताना अनेक कार्यात भाग घेतला उदा. टोप जवळ टपाल लुटले त्यात त्यांचा सहभाग होता, मणदूर गोळीबार प्रकरणात सहभाग, ऐतवडे बुद्रुक येथे प्रतिसरकार मार्फत सामुदायिक शेतीचा प्रयोग सुरू केला, राष्ट्रीय शाळा सुरू केली, प्रतिसरकारची आझाद हिंद सेना स्थापन करण्यात पुढाकार घेऊन ढगेवाडी येथे कवायत केंद्र स्थापन केले.[५]

सरकारी शेतकरी वर्गाकडून लेव्ही सरकारी धान्य सरसकट वसूल करत असे. तेव्हा ही लेव्ही शेतकऱ्यांच्याकडून त्यांच्या इच्छेप्रमाणे वसूल करावी, सरसकट नको यासाठी प्रयत्न केले. गरीब लोकांना रेशनकार्ड देण्यास प्रतिसरकारने भाग पाडले, अंधश्रध्देच्या बाबतीत लोकांना जागृत केले, तसेच दारूबंदी, हुंडा पध्दत बंद करण्यासाठी प्रयत्न केले, साक्षरता वाढीसाठी मोठे प्रयत्न केले प्रतिसरकारमार्फत कर्मवीर विद्यालय ऐतवडे ब्रु. या गावी सुरू केले.[६] सामुदायिक शेतीची योजना, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय या बाबतीत क्रांतीवीर नागनाथ अण्णा, राजूताई पाटील, बळवंत भाऊ बिरनाळे व वाय. सी. पाटील या मंडळींनी पुढाकार घेऊन हे कार्य साध्य केले.

## ४. शिराळा तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची योजना :

सन १९५० च्या दरम्यान सरकारने पिण्याच्या पाण्यासाठी ५० टक्के अनुदानाची योजना संपूर्ण सांगली जिल्ह्यात राबविण्याचे जाहीर केले होते परंतु ५० टक्क्यात ही योजना पूर्ण होणे कठीण होते. १९५२ च्या निवडणूक प्रचार दौऱ्यासाठी शिराळा भागात फिरत असताना लोंकानी वाय. सी. पाटील यांच्याकडे पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात अनेक तक्रारी मांडल्या. पिण्याचे पाणी विहीरी, तलाव व नद्या यातून आणावे लागते हे पाणी अस्वच्छ असे. परिणामी कॉलरा, नारू वगैरे सारखे रोग फैलावत. लोकांनी या समस्या त्यांना सांगितल्या तेव्हा या अडचणींचा विचार करून त्यांनी सरकारकडे पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून बंदीस्त विहीरी खोदून मिळाव्यात व त्याद्वारे लोकांना स्वच्छ पाणी मिळावे असे प्रस्ताव करून सरकारकडे गावामार्फत अर्ज करण्याचे प्रयोजन केले. मात्र सरकारने यासाठी अनुदान म्हणून ५० टक्के रक्कम देण्याचे मान्य केले.

वाय. सी. पाटील यांनी ५० टक्क्यात हे काम पूर्ण होणार नाही म्हणून स्वत: त्यांनी गावोगावी जाऊन योजनेचे महत्व पटवून दिले व गावातील लोकांना विहिरींच्या कामावर श्रमदान करण्यासाठी प्रत्येक गावातील एका कार्यकर्त्यांची नेमणूक केली. वाय. सी. पाटील हे स्वत: चार दिवसातून एकदा सायकलवरून कामाची पाहणी करत असत. कामात काही अडचण आल्यास त्याची सोडवणूक करीत असत. या कामाची बिले सांगलीहून आणावी लागत होती त्यामुळे पैशाचा वेळेचा अपव्यय होत होता म्हणून त्यांनी ही बाब जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली व बिले देण्याचा सोय शिराळा ट्रेझरीमधून मिळण्याची व्यवस्था करून घेतली. तालुक्याचे चार विभाग करून प्रत्येक विभागाला एक वार नेमून दिला व त्यांना बिले मिळण्याची सोय केली. तसेच ५० टक्क्यांऐवजी या कामासाठी ७५ टक्के रक्कम सरकारकडून मंजूर करून घेतली.[७] गावातील लोकांनी श्रमदान व लोकवर्गणीतून २५ टक्के रक्कम जमा करावी यासाठी जनतेला मार्गदर्शन केले व ही सर्व कामे गावागावात पूर्ण करून घेतली. यामुळे शिराळा तालुक्यात नारू व कॉलरा यासारख्या साथीच्या रोगांना आळा बसला.

## ५. शेतीच्या पाण्याचा प्रश्न व पाणी परिषद :

सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुका हा सर्वाधिक पावसाचा भाग असूनसुध्दा येथील शेती कोरडवाहूच राहिली होती. शेतीला कायमस्वरूपी पाण्याची सोय करण्यासाठीच पाटबंधाऱ्याची योजना राबवावी असे गाऱ्हाणे या तालुक्यातील शेतकऱ्यांनी वाय. सी. पाटील यांच्याकडे मांडले. यावर त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी विचारविनिमय करून वारणा नदीवर धरण बांधण्याचे ठरविले. यावर विचारविनीमय करण्यासाठी शेतकरी परिषद सोनवडे या गावी आयोजित केली. या परिषदेसाठी शिराळा तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे सदस्य व शेतकऱ्यांच्या कडून ५०० रू. जमा केले व सोनवडे येथे रामानंद भारती यांच्या अध्यक्षतेखाली व महाराष्ट्र राज्याचे त्या वेळचे (१९५३) पाटबंधारे मंत्री ना. मालोजीराव नाईक निंबाळकर यांना उद्‌घाटक म्हणून बोलावले. या परिषदेतच वारणा नदीवर जांभळी या ठिकाणी धरण बांधण्याचे निश्चित झाले. १९५३ साली धरणाच्या कामाची प्रगती मंदावली म्हणून त्यांनी सातत्याने धरणाचा पाठपुरावा करून सरकारला सर्व्हे करण्यास भाग पाडले. सर्व्हे नंतर जांभळी ऐवजी नांदोली हे ठिकाण धरणाच्या पायाला कठीण आधार लागत नाही म्हणून झोळंबी या ठिकाणी सर्व्हे करण्याचे आवाहन केले परंतु त्यांनी ते नाकारले शेवटी काही दिवसांनी धरणाचे ठिकाण खुजगाव येथे आणण्यात आले.[८]

खुजगाव हे ठिकाण धरणासाठी निश्चित झाल्यामुळे जवळजवळ निम्मा शिराळा तालुका पाण्याखाली बुडत होता व सुमारे २० ते २५ हजार लोकांचे पुनर्वसन करावे लागत होते. तालुक्यातील या गावांना शाहूवाडी, कराड आणि वाळवा तालुक्यात विलिन व्हावे लागत होते. या संकटातून शिराळा तालुक्याला वाचविण्यासाठी वाय. सी. पाटील यांनी गावोगावी फिरून लोकमत संघटीत केले व मणदूर येथे ना. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली सन १९६५ साली मोठी परिषद घेण्यात आली. या परिषदेसाठी सुमारे दीड लाख जनसमुदाय उपस्थित होता. याच परिषदेत खुजगावचे ठिकाण रद्द न केल्यास व्यापक जनआंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त केला. याचा परिणाम म्हणून खुजगावच्या ऐवजी चांदोली येथे धरणाची जागा निश्चित करण्यात आली.[९] वाय. सी. पाटील यांची हरितक्रांती बाबतची

दूरदृष्टी या धरणामुळे पूर्णत्वास गेली. त्यांनी १९५३ सालापासून परिषदा घेऊन लोकजागृती केली म्हणून आज वारणा खोऱ्याचा सर्वांगीण विकास झालेला आहे.

## ६. धरणग्रस्तांचे पुनर्वसन :

धरणग्रस्तांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांचे यथायोग्य पुनर्वसन करण्यासाठी आरळा येथे वारणा धरण पुनर्वसन संग्राम समितीच्या वतीने वाय. सी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली भव्य परिषद घेण्यात आली. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी या परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले होते. क्रांतिसिंह नाना पाटील, बाबा आढाव, वाय. सी. पाटील यांचे परिषदेस मार्गदर्शन लाभले. या परिषदेत सर्वानुमते असा ठराव मांडला की, 'अगोदर पुनर्वसन, मग धरण' व तो संमत करण्यात आला. याच परिषदेत इतर अनेक ठराव संमत करण्यात आले. उदा. धरणग्रस्तांच्या मुलांना गुणवत्तेनुसार धरणाचे काम व साखर कारखाने तसेच सरकारी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात यावे. असे पुनर्वसन महाराष्ट्रातील इतर धरणाबाबतीत झालेले नाही. धरणग्रस्तांचे योग्य तऱ्हेने पुनर्वसन व्हावे म्हणून चळवळ करून सरकारला १९७६ चा पुनर्वसन कायदा करणे भाग पाडले.

## निष्कर्ष:

यशवंत चंद्रोजी उर्फ वाय. सी. पाटील यांनी आपले सर्व जीवन डाव्या चळवळीत खर्ची घातलेले दिसून येते. विद्यार्थी दशेपासूनच त्यांच्यावर राष्ट्र सेवा दलाचा प्रभाव होता नागनाथअण्णा नायकवडी यांच्या सोबत ते विद्यार्थिदशेपासूनच विविध आव्हानांना सामोरे गेल्याचे दिसून येते. सातारा प्रतिसरकार मध्ये त्यांनी आझाद हिंद सेना स्थापन करण्यात पुढाकार घेतला यावरून त्यांच्यातील नेतृत्वगुण दिसून येतात. त्यांची हरितक्रांती बाबतची दूरदृष्टी चांदोली धरणामुळे पूर्णत्वास गेली. त्यांनी १९५३ सालापासून पाणी परिषदा घेऊन लोकजागृती केली म्हणून आज वारणा खोऱ्याचा सर्वांगीण विकास झालेला आहे.स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी शेतकरी, कामगार, धरणग्रस्त, महिला इ. सर्वसामान्य वर्गांच्या विकासासाठी मोठे कार्य केले आहे.

## संदर्भ साधने:

१. कुंभार. शि.य., स्वांतत्रय लढयातील धगधगते व्यक्तिमत्व, स्वांतत्रसेनानी वाय.सी. पाटील, शांतिनिकेतन प्रकाशन, सांगली, २०१०, पृ. ११.
२. कित्ता, पृ. १३.
३. कित्ता, पृ. २१.
४. धर्माधिकारी भा. वि., क्रांतिवीर—नागनाथ अण्णा नायकवडी चरित्र ग्रंथ, प्रकाशक, नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती, वाळवा, २००७,पृ. ४६—४७.
५. कित्ता, पृ. ५१
६. दै. राष्ट्रशक्ती, सांगली, दि. ३०/९/१९७९, पृ. ३.
७. कित्ता, पृ. ४.
८. कुंभार शि. य., उपरोक्त, पृ. २७.
९. दै. अग्रदूत, सांगली, ३०/०९/१९७०, पृ. २.